यवतमाळ जिल्हा
देशोन्नती
यवतमाळ : रविवार
दि. ९ ऑगस्ट २००९



# अडचणीला संधी समजून करीअर घडविण्याची क्षमता ठेवा : *प्रा. विजय नवले*




*शहर प्रतिनिधी/८ ऑगस्ट*

**पुसद :** विपरीत परिस्थितीत डगमगून न जाता अडचण हीच संधी समजून विद्यार्थ्यांनी करीअर घडविण्याची क्षमता ठेवावी, असे मोलाचे मार्गदर्शन भारत निर्माण अभियान कार्यक्रमांतर्गत 'माय नेशन माय करिअर' विषयावर पुणे येथील प्रा. विजय नवले यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, हल्ली पालक आपल्या पाल्याच्या शैक्षणिक धोरणाबाबत जागरूक आहे. मात्र पाल्यांचे करिअर घडवितांना करिअरला पैसे कमविण्याचे साधन न बनविता आयुष्य जगण्याचा मार्ग बनवावे. जे आवडते तेच काम करून आनंद मिळेल. करिअर घडवितांना आंवड, क्षमता व पात्रता ही त्रिसुत्री लक्षात ठेवावी. संपूर्ण देशाला आपले कार्यक्षेत्र समजून करिअरच्या माध्यमातून देशसेवा करावी असे त्यांनी आवाहन केले. अनेक क्षेत्रांमध्ये कुशल लोंकांची आवश्यकता आहे. तेव्हा अशा क्षेत्रामध्ये जाऊन करिअर घडविल्यास सर्वस्व प्राप्ती होईल. संकटातून मार्ग काढण्याची जिद्द ठेवण्या संदर्भात त्यांनी 'प्रॅक्टीकल उदाहरणे' दिलीत. शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात करिअरबद्दल मार्गदर्शन करण्यास सदैव तत्पर राहू असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी अनेकांच्या शंकाचे निरसन केले. नाना मेश्राम यांनी प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय व आभार प्रदर्शन केले. यावेळी क्षेत्रीय संचालक जे.आर.एम. पवार उपस्थित होते.